# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## मा. क प्रभाग समिती
## कार्यपत्रिका क्रमांक - १
## (मा.सभापती निवडीची विशेष सभा)
## सभावृत्तांत

दिनांक –०९/०८/२०१७ वेळ : दु.१२.००

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेष सभा बुधवार दिनांक ०९/०८/२०१७ रोजी दु.१२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात, मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे मार्फत नेमणूक केलेले पीठासीन अधिकारी मा. शेखर गायकवाड (भा.प्र.से) मा. संचालक संचालनालय,भुजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, भुजल भवन, कृषी महाविद्यालयाजवळ वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.अश्विनी संतोष जाधव
२. मा.सारीका शिवाजी सस्ते
३. मा.राहुल गुलाब जाधव
४. मा.वसंत प्रभाकर बोराटे
५. मा.लांडगे सारिका संतोष
६. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
७. मा.सावळे सिमा रविंद्र
८. मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

याशिवाय श्री. अण्णा यशवंत बोदडे, प्र. क्षेत्रीय अधिकारी, श्री.रामकिसन कचरु लटपटे, प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, हे उपस्थित होते.

-------

| | |
|---|---|
| पीठासीन अधिकारी | सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. **क प्रभाग समिती**च्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.<br><br>**सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.** |
| **प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )** | मा. क प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणेकामी एकूण १ नामनिर्देशन पत्र मुदतीत दाखल झालेले आहे. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे |

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोगकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. अश्विनी संतोष जाधव | मा.सावळे सिमा रविंद्र | मा. वसंत प्रभाकर बोराटे |
| २ | मा. अश्विनी संतोष जाधव | मा. बोइनवाड यशोदा प्रकाश | मा. सारीका शिवाजी सस्ते |

( प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकुण २(दोन) नामनिर्देशनपत्रे मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

मा.पीठासीन अधिकारी

मा. क प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एका उमेदवाराचे २ (दोन) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असुन दोन नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत.

त्यामध्ये मा. क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.अश्विनी संतोष जाधव ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पीठासीन अधिकारी यांचेकडे देवून त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

**(पीठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी १२.०५ ते १२.२० मि. हा १५ मिनिटींचा कालावधी संपला)**

उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेण्यात आली नसल्याने मा. क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणा-या मा.अश्विनी संतोष जाधव ह्या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यामुळे मा. अश्विनी संतोष जाधव यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

**सही/-**
**शेखर गायकवाड (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
संचालक, संचालनालय, भुजल सर्व्हेक्षण आणि
विकास यंत्रणा ,भुजल भवन, शिवाजीनगर, पुणे

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक – १

दिनांक –०९/०८/२०१७ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा.अश्विनी संतोष जाधव या उमेदवाराने एकूण २ (दोन) नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केली असून सदर नामनिर्देशनपत्र वैध ठरलेले आहे. क प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा.अश्विनी संतोष जाधव ह्या एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे क प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

सही/-
**शेखर गायकवाड (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
संचालक, संचालनालय, भुजल सर्व्हेक्षण आणि
विकास यंत्रणा ,भुजल भवन, शिवाजीनगर, पुणे

यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी नवनिर्वाचित सभापती **मा.अश्विनी संतोष जाधव** यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.)

( नवनिर्वाचित सभापती **मा.अश्विनी संतोष जाधव** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

ठराव क्रमांक -२ विषय क्रमांक-२

दिनांक –०९/०८/२०१७

सुचक- मा.सीमा सावळे अनुमोदक-मा.राहूल जाधव

संदर्भ – मा.सीमा सावळे,मा.राहूल जाधव यांचा प्रस्ताव.

क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या मंगळवारी दु. १२.०० वा.** (पहिल्या मंगळवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा.अश्विनी संतोष जाधव** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(**मा.अश्विनी संतोष जाधव** )
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.
क्र-कक्षेका/कावि/ ०९/२०१७.
दिनांक- ०९/०८/२०१७.



प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.